महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

## प्रादेशिक कार्यालय,मोर्शी रोड,अमरावती-४४४६०३

Website : www.rodvetamti.org

E-mail :१) jtdir.amaravati@dvet.maharashtra.gov.in २) dydt_amt@yahoo.co.in

*Phone No*.०७२१- २६६०३२०, २६६६०४८/*Fax No* :- २६६०३२० (*Personal* ): ०७२१-२६६६१८६

## नागरिकांच्या सनदे अंतर्गत नागरिकांना पुरविल्या जाणा-या सेवा

| अ. क्र | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांची नांवे व हुद्या | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्या |
|---|---|---|---|---|
| १ | *** शिल्प कारागीर योजना.**<br>*** पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप**<br>*** सिओई (जागतिक बॅक प्रकल्प**<br>*** आदिवासी सार्वत्रीकरण**<br>*** अल्पसंख्याक योजना**<br>उमेदवारांना रोजगारक्षम बनविण्यासाठी त्यांना कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण देणे व त्याद्वारे त्यांना नियमीत उत्पन्नाची साधने उपलब्ध करण्यासाठी व रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त करण्याकरीता या योजने अंतर्गत या विभागामध्ये एकुण ५८ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, असुन १ उच्च स्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ४ आश्रम शाळा, या संस्थेमधुन उक्त योजनेमधुन प्रशिक्षणा करीता एकुण प्रवेश क्षमता १५७४४ इतकी आहे. (संस्थानिहाय व्यवसायनिहाय व्यवसायाची माहीती या कार्यालयाच्या वेब साईट वर उपलब्ध आहे. ) | १) श्री. पी. यु. तिडके, सहाय्यक संचालक,<br>२) श्री. रा.गु. ठाकरे, निरीक्षक,<br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br>५) संबधित औ. प्र. संस्थेतील प्राचार्य, | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| २ | **मागेल त्याला प्रशिक्षण :-**<br>अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना शासकीय औ. प्र. संस्थेमध्ये अल्प मुदतीचे प्रशिक्षण देवून प्रशिक्षित करणे व स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी एमसीईडी/मिटकॉन यांच्या मार्फत उद्योग सुरु करण्यांचे प्रशिक्षण देवून स्वयंरोजगारासाठी टुलकिट्स देण्याची योजना शासनाने वंचित घटकासाठी सुरु केली. त्याकरिता सन २००३ पासुन विभागातील सर्व शासकीय औ. प्र. संस्थामधून मागेल त्याला प्रशिक्षण हि योजना राबविण्यांत येते आहे. | १) श्री. पी. यु. तिडके, सहाय्यक संचालक,<br>२) श्री. रा.गु. ठाकरे, निरीक्षक,<br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br>५) संबधित औ. प्र. संस्थेतील प्राचार्य, | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **लोकसेवा केंद्र योजना :-**<br>अशिक्षित, कमी शिक्षित, अर्धवट शाळा सोडलेले, शिक्षित पण बेरोजगार, कारखाने बंद झाले म्हणून बेरोजगार झालेले उमेदवार अशा लाभार्थ्यासाठी प्रशिक्षण व काम यासाठी योजना तयार करण्यांत आली. शासनाने औद्योगिक प्रशिक्षणासाठी मोठया प्रमाणात पायभूत सुविधा निर्माण केलेल्या आहेत. त्याचा वापर नियमीत कामानंतर, सुट्टीच्या दिवशी करुन याचा फायदा उपरोक्त घटकासाठी करण्याचा तसेच सामाईक सुविधा निर्माण करुन प्रशिक्षित उमेदवारांना यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देणे व त्याचे सेवागट स्थापन करुन त्याना कामाच्या जगात प्रवेश करण्यास सहकार्य करणे या उद्देशातून प्रत्येक शासकीय औ. प्र. संस्थेमध्ये लोकसेवा केंद्र सन २००५ पासून सुरु आहे. | १) श्री. पी. यु. तिडके, सहाय्यक संचालक,<br>२) श्री. रा.गु. ठाकरे, निरीक्षक,<br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br>५) संबधित औ. प्र. संस्थेतील प्राचार्य, | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| ४ | **अल्पसंख्यांक योजना :-**<br>शासनाने अल्पसंख्यांक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, जैन व पारशी या समाजातील उमेदवारांमधील बेरोजगारीची समस्या लक्षात घेवुन त्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने व त्यांच्याकरिता नियमित उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने अल्पसंख्यांक विकास विभागाने समाजातील बेरोजगार युवक/युवतींना प्रशिक्षण कार्यक्रम औ. प्र. संस्थेतुन सन २००९ पासुन राबविण्यांत येत आहे. | १) श्री. पी. यु. तिडके, सहाय्यक संचालक,<br>२) श्री. रा.गु. ठाकरे, निरीक्षक,<br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br>५) संबधित औ. प्र. संस्थेतील प्राचार्य, | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| ५ | **आर्टीझन टेक्नोक्रॅट :-**<br>या विभागामध्ये प्रोजेक्ट युनाईट कार्यक्रमा अंतर्गत पदविका अभ्यासक्र औ. प्र. संस्था, अमरावती / अमरावती मुलींची व आर्टीझन टू टेक्नोक्रॅट कौशल्य चाचणी परिक्षा सन २००५ पासुन जिल्हास्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सुरु आहे. | १) श्री. पी. यु. तिडके, सहाय्यक संचालक,<br>२) श्री. रा.गु. ठाकरे, निरीक्षक,<br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br>५) संबधित औ. प्र. संस्थेतील प्राचार्य, | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | **शिकाऊ उमेदवारी योजना :-**<br>औद्योगिक आस्थापनेतील प्रशिक्षण (ऑन द जॉब ट्रेनिंग) हे शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत थेट प्रशिक्षणासाठी औद्योगिक आस्थापनात पाठविएयांत येते व तेथे त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यांत येते.दुस-या प्रकारात औ.प्र.संस्थेमधील उत्तीर्ण उमेदवार प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण घेतात.दोन्ही प्रकारची एन.सी.व्ही.टी. मार्फत परिक्षा घेऊन एकाच प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाते. प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांना द.म. प्रथम वर्षी रु १४४०/-,व्दितीय वर्षी रु १७००/-,तृतीय वर्षी रु १९७०/- व चवथ्या वर्षी रु २२२०/- विद्यावेतन औद्योगिक आस्थापनांकडून उमेदवारांना देण्यांत येते.आदिवासी उमेदवारांना प्रशिक्षणादरम्यान उदरनिर्वाह चालविण्यासाठी द.म. १०००/- निर्वाह भत्ता देण्यांत येतो.सद्यस्थितीत या विभागात अंदाजे १०० उमेदवार या योजनेचा लाभ घेतात उमेदवार प्रशिक्षित झाल्यानंतर त्यांची रोजगार क्षमता वाढते. | १ श्री पी.यु.तिडके,<br>सहाय्यक संचालक<br><br>२ श्री आर.जे.नेमाडे,<br>सहा.प्रशि.सल्लागार(तां)<br><br>३ श्री व्ही.बी.डोंगरदिवे,<br>अधिक्षक (तां)<br><br>४ श्री ए.बी.भिवापुरे,<br>मुख्य लिपिक<br><br>५ तसेच संबंधित औ.प्र. संस्थेतील प्राचार्य | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| ७ | **मॉडयुलर एम्प्लॉयबल स्किल्सः-**<br>देशामध्ये व्यवसायिक कौशल्य असलेल्या घटकांचे प्रमाण ५ टक्के आहे.विकसित देशामध्ये तेच प्रमाण ५० टक्के इतके आहे.देशामधील असंघटीत क्षेत्रात काम करणा-या उमेदवार, बेरोजगार,५ वी उत्तीर्ण उमेदवार या सर्व घटकांना समाजाच्या /कारखान्याच्या गरजेनुसार अल्प मुदतीचे प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य तपासून एन.सी. व्ही.टी. चे प्रमाणपत्र देण्यांत येते.याद्वारे व्यवसायिक प्रशिक्षित उमेदवार मोठया प्रमाणवर उपलब्ध होतील.उत्तीर्ण उमेदवारास प्रशिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क केंद्र शासनामार्फत परत केल्या जाते . विभागातील सर्व शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये एमईएस हि योजना राबविण्यांत येत आहे.या योजनेतंर्गत विविध अशा २० सेक्टरशी निगडीत १५० अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत. | १ श्री पी.यु.तिडके,<br>सहाय्यक संचालक<br><br>२ श्री आर.जी.ठाकरे,<br>निरिक्षक<br><br>३ श्री व्ही.बी.डोंगरदिवे,<br>अधिक्षक (तां)<br><br>४ श्री आर.जी.भुताड,<br>वरिष्ठ लिपिक<br><br>५ तसेच संबंधित औ.प्र. संस्थेतील प्राचार्य | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | **उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना :-**<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणा-या कौशल्यात वाढ व्हावी त्याच प्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना कमवा व शिका यासाठी उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना राज्यात प्रथमच सुरु केली याचा लाभ संस्थेला व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या दरम्यान होतो.त्याकरिता सन २००२ पासून सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये हि योजना राबविल्या जाते .या योजने अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध प्रकारची बाहेरील कामे स्विकारुन संस्थेतील साधन सामुग्रीचा महत्तम वापर करुन महसुल शासनास जमा करण्यांत येतो. | १ श्री एम.डी.वानखडे, सहाय्यक संचालक<br><br>२ श्री आर.जी.ठाकरे, निरिक्षक<br><br>३ श्री एन.एस.निकम, अधिक्षक (तां)<br><br>४ श्री व्ही.ओ.वानखडे, वरिष्ठ लिपिक<br><br>५ तसेच संबंधित औ.प्र. संस्थेतील प्राचार्य | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| ९ | **आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे:-**<br>अमरावती विभागातील ४ शासकिय आश्रम शाळांचे रुपातंर व्होकेशनल ट्रनिंग सेंटर मध्ये करण्यांत आले.याव्दारे ८ वी ते १० वी दरम्यान तांत्रिक शिक्षण व तद्नंतर आयटी आय च्या प्रशिक्षणाची सोय आश्रमशाळेतच करण्यांत आली सन २००४ मध्ये आदिवासी उमेदवारांसाठी व्यवसाय शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे या अंतर्गत एकूण १२ योजना राबविण्यांत येतात. | १ श्री पी.यु.तिडके, सहाय्यक संचालक<br><br>२ श्री आर.जी.ठाकरे, निरिक्षक<br><br>३) श्री.व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक(तां),<br><br>४) श्री. बी. पी. निंघोट, वरिष्ठ लिपीक,<br><br>५ तसेच संबंधित औ.प्र. संस्थेतील प्राचार्य | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| १० | **महिलांकरिता आदिवासी औ.प्र.संस्थांमध्ये विविध व्यवसायांमध्ये प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत :-**<br>या योजनेमुळे दरवर्षी २०० आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ होतो तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन ,वसतिगृहात राहणा-या व वसतिगृहा बाहेर राहणा-या आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना अनुक्रमे रु ६००/-,रु ५००/-प्र.मा.निर्वाह भत्ता देण्यांत येतो. | १ श्री पी.यु.तिडके, सहाय्यक संचालक<br><br>२ श्री आर.जी.ठाकरे, निरिक्षक<br><br>३ श्री व्ही.बी.डोंगरदिवे, अधिक्षक (तां)<br><br>४ श्री बी.पी.निंघोट, वरिष्ठ लिपिक<br><br>५ तसेच संबंधित औ.प्र. संस्थेतील प्राचार्य | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |

| केंद्रशासीत पुरस्कृत +२ स्तरावरील व्यवसाय योजना | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | **व्दिलक्षी :-**<br>उच्च माध्यमिक स्तरावर असलेले अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना रोजगार व स्वंयरोजगार मिळण्याच्या दृष्टीकोनातुन व्यवसायभिमुख व ग्रामिण विकासाशी सांगड घालणारे पाठ्यक्रम शासनाने १९७८ पासून +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम योजना सुरु केली.या अभ्यासक्रमात व्यवसाय अभ्यासक्रमाची ३३ टक्के व्याप्ती असून याचा उद्देश ,उच्च तंत्र शिक्षण घेण्यास संधी मिळवून देणे व उच्च शिक्षण घेऊ न शकणा-या विद्यार्थ्यांना रोजगार व सवंयरोजगार करण्या-इतपत सक्षम बनवून कुशल मानव संसाधन निर्मिती करुन बेरोजगारी कमी करणे असा आहे. | १ श्री पी.यु.तिडके, सहाय्यक संचालक<br>२ श्री आर.जे.नेमाडे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार(तां)<br>३ सौ एस.आर.वानखडे, अधिक्षक (तां)<br>४ सौ एम.व्ही.पळसकर, वरिष्ठ लिपिक<br>४ श्री जी.जी.कोरे, वरिष्ठ लिपिक | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| १२ | **एच.एस.सी.व्होकेशनल व्यवसाय अभ्यासक्रम(पुर्वीचे एमसीव्हीसी):-**<br>+२ स्तरावरील (१२वी) व्यवसाय शिक्षण घेऊनबाहेर पडणारे विद्यार्थी स्वत:च्या पायावर उभे राहण्याच्या दृष्टीने व्यवसाय विषयाची व्याप्ती वाढविण्यासाठी १९८६ मध्ये नविन शैक्षणिक धोरण जाहीर केले त्यामध्ये<br>१) व्यवसाय क्षेत्रातील नोकरीची /स्वंयरोजगारा ची संधी उपलब्ध करुन देऊन प्रत्येकाची रोजगार क्षमता वाढविणे<br>२) कुशल कारागिरांची मागणी व पुरवठा याचा समन्वय साधणे.<br>३) उच्च शिक्षणावरील भार कमी करणे या सर्व गोष्टीचा विचार करुन वर्ष ८८-८९ पासुन ७०% व्यवसायाची व्याप्ती असलेली व्यवसाय शिक्षण योजना सुरु करण्यात आली या अभ्याक्रमात तंत्र वाणिज्य , कृषी,अर्धवैद्यकिय,मस्त्य व गृहशास्त्र इत्यादी ६ गटातील शिक्षण दिले जाते. | १ श्री पी.यु.तिडके, सहा.संचालक<br>२ श्री आर.जे.नेमाडे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार(तां)<br>३ सौ एस.आर.वानखडे, अधिक्षक (तां)<br>४ सौ एम.व्ही.पळसकर, वरिष्ठ लिपिक<br>५ श्री जी.जी.कोरे, वरिष्ठ लिपिक | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |
| १३ | **माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम:-**<br>माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कौशल्य, स्व कर्तृत्व,क्रियाशिलता इत्यादी गुणांचा विकास होण्याकरिता व या अभ्यासक्रमामुळे व्यवसाय/तांत्रिक विषयाची आवड निर्माण | १ श्री पी.यु.तिडके, सहा.संचालक<br>२ श्री आर.जे.नेमाडे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार(तां) | नियमित | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | होऊन शालेय जिवनात रोजगार/ स्वंयरोजगारां साठी आवश्यक त्या उद्यमशिलतेचा विकास होण्यासाठी ,माध्यमिक स्तरावर तांत्रिक विषय राबविले जातात,हा अभ्यासक्रम उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना **१)**औ.प्र.संस्थेत प्रवेशाकरीता २५% जागा राखीव.**२)** तंत्रनिकेतन मध्ये प्रवेशाकरिता १५% जागा राखीव.**३)** ११ वी व्यवसाय अभ्यासक्रम प्रवेशाकरिता २५% जागा राखीव.**४)** व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या परिक्षेस थेट बसण्याची संधी.**५)**स्वंयरोजगारासाठी कर्ज मिळण्यास प्राधान्य इ.फायदे मिळविता येतात.<br>या अभ्यासक्रमातुन शिक्षण घेतल्यानंतर त्यास उद्योगअसणा-या प्रक्रियांमध्ये,आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्यासाठी तसेच तो स्वावलंबी बनावा यासाठी इयत्ता १२ वी किमान कौशल्य व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी कायद्यातंर्गत टेक्निशियन (व्होकेशनल)मिळण्यासाठी शासनाने , शासन परिपत्रक क्र व्हीओसी २००३/(१३१/०३) व्यशि-३ दि.२८/०४/२००४ नुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून +२ स्तरावरील किमान कौशल्य व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१(सुधारीत -१९८६) नुसार टेक्निशियन (व्होकेशनल)मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्य करीत आहे.<br>या योजनेतंर्गत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे मार्फत दरवर्षी शिकाऊ उमेदवारी जागा स्थित करणे व भरती करणे योजनेत घेतलेल्या प्रशिक्षणाचे मुल्याकंन करणे,निरिक्षण करणे इ.कार्यवाही करण्यांत येते.<br>+२ स्तरावरील किमान कौशल्य व्यवसाय अभ्यासक्रमातंर्गत राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमा पैकी एकूण २४ व्यवसाय अभ्यासक्रमांना शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ (सुधारीत -१९८६) नुसार टेक्निशियन (व्होकेशनल) उमेदवारी लागु करण्यांत आली आहे.प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना द.म. रु १०९० देण्यांत येते | ३ सौ एस.आर.वानखडे, अधिक्षक (तां)<br><br>४ सौ एम.व्ही.पळसकर, वरिष्ठ लिपिक<br><br>५ श्री जी.जी.कोरे, वरिष्ठ लिपिक | | **श्री एस.एम.हस्ते, सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती** |

नागरी सनदेची माहिती Internet वर http://www.rodvetamti.org या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.